स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आणि राज्यातील
मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळेतील
बी.एड. शिक्षकांना प्रशिक्षित समजण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक :- पीआरई २००६/४९९१/२००६/प्राशि-१

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक : ११ नोव्हेंबर, २०११.

**संदर्भ :** १) शिक्षण रोजगार व युवक सेवा विभाग क्र.पीटीपी-१०७७/१४६९३ (१५०२) सात, दिनांक १४ नोव्हेंबर १९७९.

२) शासन पत्र, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र.पीआरई-१०८३/६४९१२ (५७०२)/प्राशि-१ दिनांक २३ सप्टेंबर १९८३.

३) शासन परिपत्रक क्र.पीआरई-२०००/(२५८७)/प्राशि-१, दिनांक २५ ऑक्टोबर २०००.

४) शासन निर्णय, शा.शि.वि.क्र.पीआरई-२००० (२५८७)/प्राशि-१, दिनांक १२ नोव्हेंबर,२००१.

**<u>प्रस्तावना :</u>** महाराष्ट्र एम्पॉइज ऑफ प्रायव्हेट स्कूल्स (कंडिशन ऑफ सर्व्हीसेस), रुल्स, १९८१ मधील अनुसूची ब-(एक) मध्ये प्राथमिक शिक्षकांच्या अर्हता नमूद केलेल्या आहेत. त्यानुसार एस.एस.सी. आणि शिक्षण पदविका परीक्षा किंवा (दोन वर्षाच्या कालावधीची शिक्षण पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. त्यामुळे प्राथमिक शाळेतील शिक्षक पदवीधर बी.एड. असला तरी त्यास अप्रशिक्षीत शिक्षक समजण्यात येत आहे. तथापि, संदर्भाधीन क्र. १ च्या शासन निर्णयान्वये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्राथमिक शाळांना जोडलेल्या इयत्ता ५ वी ते ७ वी च्या वर्गांना शिक्षक मंजूरीच्या निकषानुसार जेथे ४ किंवा त्यापेक्षा अधिक शिक्षक पदे मान्य होतात तेथे देय पदांपैकी २५% पदे पदवीधर प्रशिक्षित शिक्षकांच्या वेतनश्रेणीमध्ये परावर्तीत करण्याची प्रक्रीया उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

२. तसेच, संदर्भाधीन पत्र क्र.२ च्या पत्रान्वये दि.२३ सप्टेंबर १९८३ पर्यंत सेवेत असलेले बी.ए.बी.एड. खाजगी प्राथमिक शाळेमध्ये नियुक्त करण्यात आलेले बी.ए.बी.एड. शिक्षक प्रशिक्षित समजण्यात आलेले आहेत.

३. संदर्भाधीन क्र. ३ व ४ च्या आदेशान्वये राज्यातील प्राथमिक शिक्षकांमध्ये दि.५ मे २००० पूर्वी नियुक्त करण्यात आलेले सर्व बी.एड. अर्हता धारक शिक्षकांना अप्रशिक्षित समजून त्यांना पत्राद्वारे प्रशिक्षणासाठी पात्र समजण्यात आलेले आहे.

४. प्राथमिक शाळांना जोडलेल्या इ.५ वी ते ७ वी या वर्गांना देय होणा-या पदवीधर प्रशिक्षित शिक्षकांच्या पदांसंदर्भात मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.४६३२/९९ व दि.६ मे २००४ रोजी पारीत केलेला निर्णय व मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.१५३११-१५३३१/२००५ मध्ये दि.२० फेब्रुवारी २००७ रोजी दिलेले आदेश विचारात घेऊन प्राथमिक शाळांना जोडलेल्या इ.५ वी ते इ.७ वी या वर्गांना देय होणा-या प्रशिक्षित पदविधर शिक्षकांच्या नियुक्त्या व प्राथमिक शाळेतील पदवीधर बी.एड. शिक्षकांना प्रशिक्षीत म्हणून सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**<u>शासन निर्णय</u> :-** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था, तसेच खाजगी प्राथमिक शाळांमधील इयत्ता १ली ते ७ वी या वर्गांना प्रशिक्षित पदवीधर बी.एड. शिक्षकांची नेमणूक केली असल्यास खालील पध्दतीचा अवलंब करण्यात यावा.-

**अ)** प्राथमिक शाळेतील पदवीधर शिक्षकांच्या (२५ %) पदावर बी.ए./बी.एस.सी. व बी.एड. अगोदर अर्हता धारण करुन (डी.एड. ही अर्हता नसणारे) या पदावर शिक्षकाच्या नियुक्त्या केल्या असल्यास **अशा शिक्षकांना नियुक्तीच्या दिनांकापासून प्रशिक्षीत शिक्षक म्हणून समजण्यात यावे.** त्यांना पदवीधर प्रशिक्षिताची (बी.एड.) वेतनश्रेणी देण्यात यावी.

**ब)** प्राथमिक शाळेत या प्रशिक्षित (बी.एड.) पदवीधर शिक्षकांसाठी अनुज्ञेय असलेल्या **२५% पदांव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्राथमिक शिक्षकाच्या** पदावर **(डी.एड अर्हता धारण न करणारे) पदवीधर व बी.एड.** शिक्षकांच्याही नियुक्त्या केल्या असल्यास त्यांच्या नियुक्त्यांच्या दिनांकापासून अशा शिक्षकांना प्रशिक्षित शिक्षक समजण्यात यावे. अशा शिक्षकांना त्यांच्या नियुक्तीच्या वेळी देय असलेली डी.एड. प्रशिक्षित शिक्षकाची वेतनश्रेणी {आता ५२००-२०२०० + ग्रेड पे २८००} देय राहील. जर शिक्षण सेवक म्हणून सेवेत असल्यास त्यांना शिक्षण सेवकांचा परिविक्षाधीन कालावधी पूर्ण केल्यानंतरच ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

**क)** प्राथमिक शाळेतील इयत्ता ५वी ते ७वी वर्गाच्या पदवीधर शिक्षकांच्या (२५ %) पदावर नियुक्त असलेल्या केवळ डी.एड. अर्हता धारण करीत असलेल्या व नंतर बी.एड. ही अर्हता धारण करण्यास परवानगी दिलेल्या शिक्षकांना या निर्णयामुळे बाधा होत असेल तरी त्यांच्याकडून कोणतीही वसूली करण्यात येऊ नये.

**ड)** जे प्राथमिक शाळेतील पदवीधर बी.एड. शिक्षक हे अप्रशिक्षीत शिक्षक म्हणून **सेवानिवृत्त झाले आहेत अशा शिक्षकांना** नियुक्तीच्या दिनांकापासून प्रशिक्षीत समजण्यात यावे व देय असल्यास त्यांना प्रशिक्षित शिक्षक म्हणून सेवानिवृतीचे लाभ देण्यात यावेत.

२. बी.एड. अर्हता धारक शिक्षकांच्या नियुक्त्या अप्रशिक्षित प्राथमिक शिक्षक म्हणून पुढे सुरु ठेवण्याबाबत व त्यांना पत्राद्वारा प्रशिक्षण करण्याचा शासन निर्णय क्र. क्र.पीआरई-२०००(२५८७)/प्राशि-१, दिनांक १२ नोव्हेंबर,२००१ (उपरोक्त संदर्भ क्र.४) चे आदेश आता रद्द करण्यात येत आहेत.

३. उपरोक्त अप्रशिक्षीत शिक्षकांना प्रशिक्षीत शिक्षक म्हणून समजण्याबाबत आदेश निर्गमित झाल्यानंतर यामधील वाढीव वित्तीय भाराचा खर्च हा मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर आदेश हे वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५५३/२०११ दि.१९-१०-२०११ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०११११११११४२०४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( झं. सां. रणदिवे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे.
प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, जवाहर बालभवन, चर्नीराड, मुंबई.
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
संचालक, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ, पुणे.
संचालक, राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था, पुणे.
शिक्षण संचालक (प्रौढ), महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, औरंगाबाद.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
सर्व प्रशासकीय अधिकारी महानगरपालिका/नगरपालिका/शिक्षण मंडळे
नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
महासंचालक माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती, प्राशि-१